| जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट- www.nanded.gov.in | ई-मेल –dmbackoffice@gmali.com |
| दुरध्वनी क्रमांक-02462-245946 | फॅक्सः 02462-245946 |
| शाखाः- नांदेड जिल्हा सेतू समिती | क्र.2021/सेतु समिती,नांदेड/ टे-1 /सिआर |

दिनांकः- 29.12.2021

# नोटीस

जिल्हा सेतू समिती, नांदेड संचलित स्पर्धा परीक्षा अभ्यासीकेत यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर अभ्यासीकेत प्रवेश देण्यासाठी सन 2020-21 या वर्षातील निवड चाचणी परीक्षा घेण्यास्तव विद्यार्थ्याना अर्ज भरण्याचा कालावधी दिनांक 24.12.2021 पर्यंत देण्यात आलेला होता. सदर कालावधीमध्ये प्रवेश परीक्षेकरीता अल्प प्रतिसाद मिळाला असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत परीक्षा फिस भरणा केलेली आहे अशा विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा न घेता अभ्यासीकेमध्ये थेट प्रवेश देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा फिस भरणा केलेली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा फिस ही अभ्यासीका प्रवेश शुल्क म्हणून ग्राहय धरण्यात येणार असून त्यांना वेगळयाने प्रवेश शुल्क भरण्याची आवश्यकाता नाही.

विद्यार्थ्यांना अभ्यासीकेमध्ये 01 वर्षाच्या कालावधीसाठी प्रवेश दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रथम तिन महिण्याचे मासिक शुल्क प्रति महा रु. 300/- प्रमाणे एकुण रु. 900/- प्रवेश घेतांना दिनांक 30.01.2022 रोजी पर्यंत जमा करणे अनिर्वाय आहे. पुढील प्रत्येक त्रैमासीक फिस रु. 900/- प्रमाणे अग्रीम स्वरुपात भरणा करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अग्रीम स्वरुपात त्रैमासीक फिस अभ्यासीकेत जमा करणार नाहीत आशा विद्यार्थ्यांचे प्रवेश त्या दिनांकापासून रद्द करण्यात येतील. तसेच दिनांक 30.01.2022 नंतर प्रवेश दिले जाणार नाहीत कृपया याची नोंद विद्यार्थ्यानी घावी.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा
सदस्य सचिव सेतू समिती नांदेड